महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४१ किंमत : ५ रु. | पाने ४


### दिन विशेष...

१८७६ : बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत लिहिले.

१९०१ : परमाणू रचनांचे अभ्यासक रॉबर्ट जेमिसन व्हॉडी ग्राफ यांचा जन्म झाला.

१९३३ : शास्त्रसुधारक विष्णू वामन बापट यांचा मृत्यू झाला.

१९५६ : संत गाडगेबाबा महाराज यांचा स्मृतिदिन.

सेन्सेक्स ८४,९२९.३६ +४४७.५५ (०.५३%)

डॉलर ₹ ८९.६५

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | ११ |
| दिल्ली | २० | १० |
| मुंबई | ३४ | १६ |
| नागपूर | २९ | ०९ |
| पुणे | ३० | ०७ |

### सुविचार

स्वतःवर विश्वास ठेवा, कारण आत्मविश्वास ही यशाची पहिली पायरी आहे.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०० संध्या-५:५१

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,३६,०७५/- २,०९,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### युट्यूबरच्या घरावर ईडीचा छापा

**उन्नाव ।** मनी लॉंडरिंग प्रकरणात ईडीने केलेल्या छापेमारीत एका युट्यूबरकडे अलिशान कार आढळून आल्या आहेत. तसेच या युट्यूबरने दुबईत मालमत्ता खरेदी केली आहे. ईडीच्या अधिकाऱ्यांना युट्यूबरच्या घरात लॅम्बोर्गिनी उरुस, ४, मर्सिडीज बेंझ, महिंद्रा थार या कार आढळल्या. ईडीने या कार जप्त केल्या आहेत. अनुराग द्विवेदी असे या युट्यूबरचे नाव असून तो उत्तर प्रदेशमधील उन्नाव जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याच्यावर ऑनलाईन बेटिंग ॲपचे प्रमोशन केल्याचा आरोप आहे.

### प्रीती झिंटाचा मास्टरस्ट्रोक यशस्वी!

**मुंबई ।** आयपीएल २०२६ च्या मिनी ऑक्शनमध्ये पंजाब किंग्सने ज्या खेळाडूवर विश्वास दाखवला, तो आता खऱ्या अर्थाने फॉर्मात आला आहे. ऑस्ट्रेलियाचा युवा अष्टपैलू खेळाडू कूपर कॉनोलीने बिग बॅश लीगमध्ये वादळी फलंदाजी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या कामगिरीमुळे पंजाब किंग्सचा ३ कोटींचा हा निर्णय मास्टरस्ट्रोक ठरताना दिसत आहे.

# देशात उत्पादित होईल ते स्वदेशी : मुख्यमंत्री

## वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात देवेंद्र फडणवीस यांचे मत

वृत्तसंस्थत्त । मुंबई

**देशात जे उत्पादित होईल, ते स्वदेशी. मग उत्पादन करणारी कंपनी देशी असो किंवा देशाबाहेरील, अशी स्वदेशीची नवीन संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. पहिल्या टप्प्यात आपल्याला हे स्वीकारावेच लागेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**




वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात मुख्यमंत्री बोलत होते. हिंदू एक विचार आहे. एक व्यवस्था आहे. जगण्याची एक पद्धत आहे. ही एकमेव संस्कृती आहे, जी हजारो वर्षांनंतरही जिवंत आहे. आम्ही नेहमी असे सांगत असतो की, भूतकाळात आम्ही किती प्रगत होतो, किती वैभवशाली होतो. भूतकाळातील वैभव, प्रगती फक्त सांगून उपयोग नाही, ती आता प्रत्यक्षात आणली पाहिजे. समृद्ध देश जग चालवतात. समृद्धी देशाचे विचार, परंपरा जगात स्वीकारल्या जातात. त्यामुळे आपण स्वतःला समृद्ध बनवले पाहिजे. त्यासाठी स्वदेशीला चालना दिली पाहिजे.

१४० कोटीचा देश आत्मनिर्भर झाला पाहिजे, तो परावलंबी असून उपयोगाचा नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात जे देशात तयार होते, ते सर्व स्वदेशी, असे म्हटले पाहिजे. मग ते तयार करणारी कंपनी देशी असो किंवा देशाबाहेरील. दुसऱ्या टप्प्यात या बाबत वेगळा विचार करता येईल, असेही फडणवीस म्हणाले.

पाचवी औद्योगिक क्रांती सेवा, उत्पादन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात होईल. या क्षेत्रात काम करण्यास मोठे संधी आहे. २०३० पर्यंत जगातील सर्वात विकसित समुदाय म्हणून भारत समोर येईल, त्या संधीचा आपण लाभ घेतला पाहिजे. भारताने कायम तंत्रज्ञानाचे स्वागत केले आहे. तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नवनिर्मिती केली आहे, आज भारत सरकार सोबत जे देश, कंपन्या करार करतात, त्यांच्याकडे तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाचा आग्रह धरला जातो. जगाचा भारतावर विश्वास आहे. जगातील लोकांचा चीनवर विश्वास नाही, मोठमोठे कर्ज देऊन चीन आपल्या देशावर कब्जा करतो, अशी भावना जगभरात आहे. भारताबाबत मात्र जगाला आपलेपणा, ममत्व आहे. वसुधैवकुटुंबकम या भारताच्या संस्कृतीचा प्रत्यय जगभरात येतो. त्यामुळे भारतीय उद्योगाला जगाचे दरवाजे खुले आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

### ➢ नवीन औद्योगिक क्रांती आफ्रिकेत

जगातील नवी औद्योगिक क्रांती आफ्रिका खंडात नजीकच्या भविष्यात होईल. आफ्रिका खंडात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आहे, या साधनसंपत्तीचा वापर करून उद्योगांची उभारणी करणारा देश जगावर राज्य करेल. नवी मुंबईत ५४ मजल्याची एक इमारत बांधण्यात येईल. तेथील प्रत्येक मजला एका एका आफ्रिकी देशाला देण्यात येईल. त्याद्वारे भारत आणि आफ्रिकी देशांमध्ये व्यापार, उद्योगाला चालना दिली जाईल, असेही फडणवीस म्हणाले.

### ➢ चंद्रपूरमध्ये सिमेंट कारखाना

वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या कार्यक्रमात बांगर सिमेंट कंपनीने महाराष्ट्रात दोन हजार कोटी रुपयांची आर्थिक गुंतवणूक करण्याची जाहीर केले. बांगर सिमेंट कंपनी चंद्रपूर जिल्ह्यात एक सिमेंट प्रकल्प उभारणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या बाबतची घोषणा करण्यात आली.

● केंद्र सरकारचा मोठा निर्णय, दीड लाखांपर्यंतचे उपचारही मोफत

# रस्ते अपघातातील जखमींना मदत करा अन् २५ हजार मिळवा

वृत्तसंस्था । दिल्ली

**रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र सरकारने 'गुड समॅरिटन' (मदतनीस) योजनेत ऐतिहासिक बदल केला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या योजनेच्या स्वरूपात मोठी सुधारणा जाहीर केली असून, आता मदतीचा हात देणाऱ्या व्यक्तींना अधिक सन्मान आणि आर्थिक बळ मिळणार आहे.**



**बक्षीस रकमेत ५ पटीने वाढ**

अपघातातील जखमींना तात्काळ रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये रोख बक्षीस दिले जाईल. (पूर्वी ही रक्कम केवळ ५ हजार रुपये होती.)

**'राह–वीर' सन्मान :** मदत करणाऱ्या व्यक्तीला केवळ पैसेच नव्हे, तर ङ्गराह–वीरफया पदवीने आणि प्रशस्तीपत्राने सन्मानित केले जाईल.

**मोफत उपचार (कॅशलेस):** अपघाती जखमींना रुग्णालयात दाखल केल्यानंतर पहिल्या ७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत केले जातील.

**गोल्डन अवरचे महत्त्व:** अपघातानंतरचा पहिला तास (गोल्डन अवर) अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात मदत करणाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल.

**१० मिनिटांत रुग्णवाहिका पोहोचणार!**

नितीन गडकरी यांनी राज्यसभेत माहिती दिली की, सरकार अशा प्रगत मॉडेलवर काम करत आहे, ज्यानुसार अपघातस्थळी अवघ्या १० मिनिटांत सुसज्ज रुग्णवाहिका पोहोचेल. यासाठी राज्यांशी करार केले जात असून हायटेक हेल्पलाइन यंत्रणा **(पान २ वर)**

# राजस्थानमध्ये भाड्याच्या घरात बेकायदेशीर चर्च?

● श्रीकरणपूरमध्ये बेकायदेशीर धर्मांतराच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश; जर्मन जोडप्यासह सहा जण ताब्यात







वृत्तसंस्था । जयपूर

**राजस्थानच्या सीमावर्ती भागात असलेल्या श्रीकरणपूरमध्ये बेकायदेशीर धर्मांतराचे एक मोठे प्रकरण समोर आले आहे. लक्कड मंडी येथील श्री गुरुनानक दरबार गुरुद्वाराजवळ एका नवीन भाड्याने घेतलेल्या घरात गुप्तपणे एक चर्च चालवले जात होते. एका जर्मन जोडप्यासह काही लोक गरीब लोकांना पैसे आणि इतर प्रलोभने देऊन ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास प्रवृत्त करत होते.**

याबाबतची माहिती मिळताच पोलिसांसह विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत जर्मनीचे स्वान बोज बेट जालर आणि त्यांची पत्नी सँड्रा, कर्नाटकचे संतोष वर्गीस, केरळचे मॅथ्यू, बलजिंदर सिंग खोसा आणि राजेश कंबोज उर्फ पॉपी यांना ताब्यात घेतले. हिंदू आणि शीख संघटनांचे शेकडो लोक चर्चबाहेर आणि पोलिस ठाण्यासमोर जमले होते.

पोलिसांच्या मते, श्रीकरणपूर हा भारत–पाकिस्तान सीमेला लागून असलेला एक संवेदनशील परिसर आहे. येथे परदेशी नागरिकांच्या हालचालींवर कडक निर्बंध आहेत. जर्मन जोडपे परवानगीशिवाय येथे रहात होते आणि गुप्तपणे **(पान २ वर)**

# पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या स्टार्च फॅक्टरीची फसवणूक?

प्रतिनिधी । धुळे

**स्टॉर्च युनिव्हर्सल कंपनीच्या युनिव्हर्सल स्टार्च फॅक्टरीत दोंडाईचा (ता. शिंदखेडा) येथील सायलो प्रकल्पासाठी लागणारी मशिनरी पुरवठा करण्याच्या नावाखाली तब्बल ३० लाख २५ हजार रुपयांची रक्कम उचलून मशिनरी न देता कंपनीची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.**



या घटनेत सुमारे एक कोटी १० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे या फिर्यादित म्हटले आहे. हा प्रकल्प राज्याचे पणन व राजशीष्टाचार तथा जिल्ह्याचे पालक मंत्री जयकुमार रावल यांच्याशी संबंधित आहे.

या प्रकरणी निलेश भटू बागल (३२, रा. निमगुळ, ता. शिंदखेडा) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या तक्रारीनुसार, दोंडाईचा येथील युनिव्हर्सल स्टार्च फॅक्टरीमध्ये केम–अलाईड सायलो प्रोजेक्टसाठी लागणारी मशिनरी बंद अवस्थेत असल्याने ती रतलाम येथील खेतान ॲग्रोटेक येथून मिळवून देण्याबाबत इंदूर येथील शर्मा ॲग्रोटेकचे प्रमोद नथमल शर्मा व नथमल शर्मा यांच्याशी ७ मार्च २०२२ रोजी लेखी व्यवहार ठरविण्यात आला होता.या व्यवहाराची एकूण रक्कम ६७ लाख २६ हजार रुपये इतकी ठरविण्यात आली होती. यानंतर २५ मार्च २०२२ रोजी संबंधित मशिनरीसाठी पर्चेस ऑर्डर देण्यात आली. त्यानुसार दिनांक २८ मार्च २०२२ रोजी आरटीजीएसद्वारे ३० लाख २५ हजार रुपयांची रक्कम शर्मा ॲग्रोटेक इंदूर यांना अदा करण्यात आली. मात्र, ठरलेल्या कालावधीत संबंधित मशिनरीचा पुरवठा करण्यात आला नाही. **(पान २ वर)**

# काळ्याबाजारात जाणारा युरिया कृषी विभागाने पकडला

## भडगाव येथे गुन्हा दाखल; भरारी पथकाने पाठलाग करून पकडला युरिया

प्रतिनिधी । भडगाव

**शेतकऱ्यांसाठी आणलेला युरिया तस्करीच्या माध्यमातून काळाबाजारात विकण्यासाठी निघालेल्या ट्रकचा कृषी खात्याच्या भरारी पथकाने थरारक पाठलाग करत कारवाई केली आहे. याबाबत भडगाव पोलीस स्टेशन येथे रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यत आला आहे.**



भडगाव येथील 'स्वामी ॲग्रो' या कृषी सेवा केंद्राचा चालक राकेश पाटील याने कोणताही वैध परवाना नसताना २५ मेट्रिक टन युरिया खत नाशिक जिल्ह्यातील एका कृषी सेवा केंद्राकडे बेकायदेशीररीत्या रवाना केल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाच्या भरारी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक सुभाष काटकर व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाकडून तातडीची कारवाई राबविण्यात आली.

ट्रकमधील संपूर्ण २५ टन युरिया खत जप्त करून ट्रकसह माल भडगाव पोलीस स्टेशनमध्ये आणून पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.या प्रकरणी खत (नियंत्रण) आदेश, १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत युरिया खताच्या काळ्या बाजारात विक्री व अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात कृषी विभागाने रात्री १२.०० ते १२.३० दरम्यान फिर्याद दाखल करत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर होती. **(पान २ वर)**

### पाठलाग करून पकडला ट्रक

भरारी पथकाचे अध्यक्ष पद्मनाभ म्हस्के, कृषी विकास अधिकारी, तसेच विकास बोरसे (जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक), दिगंबर तांबे (तालुका गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, भडगाव), निखील टोळकर (तालुका गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, पारोळा) व रामचंद्र पाटील (तालुका गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, पाचोरा) यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून भडगाव, कजगाव,चाळीसगाव, हिरापूर या मार्गावर धावता पाठलाग करत (एमएच ४१ एजी ४०४१) या क्रमांकाचा ट्रक पकडला.

# जळगाव महापालिका निवडणुकीची धुरा आ. राजूमामा भोळेंच्या खांद्यावर

प्रतिनिधी । जळगाव



**महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने मोठी घोषणा केली आहे. आमदार राजूमामा भोळे यांची जळगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपचे 'निवडणूक प्रमुख' म्हणून नियुक्ती केली आहे.**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी याबाबतचे पत्र जारी करत ही महत्त्वाची जबाबदारी आ. भोळे यांच्या खांद्यावर दिली आहे. जळगाव शहरात आधी लोकसभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या निकालांमुळे आमदार राजूमामा भोळे यांचा करिश्मा निर्विवादपणे सिद्ध झाला आहे. लागोपाठ मिळालेल्या या यशामुळे आणि त्यांच्या प्रभावी संघटन कौशल्यामुळेच आता आगामी महापालिका निवडणुकीतही मामांच्या नेतृत्वावर पक्षाने मोठा विश्वास दाखवला आहे. विजयाची ही परंपरा कायम राखण्यासाठी पक्षाने त्यांच्याकडे ही धुरा सोपवली असल्याचे मानले जात आहे. भाजप प्रदेशाध्यक्षांनी दिलेल्या पत्रात **(पान २ वर)**

## थोडक्यात

### प्रभाकर कला अकॅडमीतर्फे आज परंपरा कार्यक्रम



**जळगाव ।** येथील प्रभाकर कला संगीत अकॅडमीतर्फे शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे परंपरा या कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी विनामूल्य व प्रवेश खुला असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन संचालिका डॉ. अपर्णा भट-कासार यांनी केले आहे.

### अल्पसंख्यांक हक्क दिन उत्साहात साजरा

**जळगाव ।** जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमास विविध घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी जिल्हाधिकारी घुगे यांनी, अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा, कार्यक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी जागृत राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात यशदाचे प्रशिक्षक आर.अहमद यांनी मौलाना आझाद महामंडळाच्यावतीने अल्पसंख्यांकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे सादरीकरण करून मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत जिल्हास्तरावर अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची विस्तृत माहिती सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राहुल इधे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून दिली.

# कापूस, केळी, पपईसह शेतमालाला हमीभाव मिळावा; भाकिसंची मागणी

## ● राष्ट्रीय मंत्री बाबुभाई पटेल यांच्या उपस्थितीत पार पडली बैठक

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय किसान संघाची जिल्हा कार्यकारिणी बैठक राष्ट्रीय मंत्री बाबुभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत बळीराम पेठेतील संघाच्या कार्यालयात शुक्रवारी पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा व मंथन करण्यात आले.**




बैठकीला जिल्हाध्यक्ष वैभव महाजन (रावेर), जिल्हा मंत्री कर्ण बारी (जामनेर), जिल्हा उपाध्यक्ष अनिल पाटील (चोपडा), जिल्हा कोषाध्यक्ष राजेंद्र बडगुजर (पिंपळगाव हरे) यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. भारतीय किसान संघ शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्नांवर सातत्याने काम करत असून सध्या जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये संघाचे कार्य सुरू आहे. संघाचे एकूण २ हजार ४७५ सभासद आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी संघात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

दरम्यान, राष्ट्रीय मंत्री बाबुभाई पटेल हे धुळे येथे उद्या व परवा होणाऱ्या किसान संघाच्या प्रांत बैठकीसाठी दाखल झाले असून त्यांनी जिल्हा कार्यकारिणीला मार्गदर्शन केले.

### ■ बैठकीत या मुद्द्यावर चर्चा...

बैठकीत कापूस, केळी व पपई पिकांना हमीभाव मिळावा, शासकीय भरड धान्य व इतर शेतमाल खरेदी केंद्रे सुरू करण्यात यावीत, शेती साहित्य चोरीच्या घटनांवर आळा घालण्यात यावा, शेती साहित्य चोरीचे गुन्हे दाखल करून त्यांचा तपास करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, आदी मागण्या करण्यात आल्या. चिखली ते तरसोद राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून न्याय मिळवून द्यावा, या मुद्द्यावरही चर्चा झाली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे.

# महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची कागदपत्रांची जुळवाजुळव करताना दमछाक

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची कागदपत्रे जमविण्याची धावपळ सध्या चांगलीच वाढली आहे. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार अर्जासोबत विविध प्रमाणपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करणे बंधनकारक असल्याने उमेदवारांसह त्यांच्या कार्यकर्त्यांची मोठी दमछाक होत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.**



उमेदवारी अर्जासाठी जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, थकीत कर नसल्याचा दाखला, मालमत्तेचा तपशील, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे. यासाठी तहसील कार्यालय, समाजकल्याण विभाग, महापालिका, पोलीस ठाणे आदी शासकीय कार्यालयांमध्ये इच्छुकांची गर्दी वाढली आहे.

आरक्षित जागांसाठी उमेदवारी करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळवणे मोठे आव्हान ठरत आहे. काही ठिकाणी कर्मचारी अपुरे असल्याने तसेच सर्व्हरच्या अडचणींमुळे कागदपत्रांची प्रक्रिया रखडत आहे.

अनेक उमेदवारांना कागदपत्रांतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत.

दरम्यान, अर्ज भरण्याच्या अंतिम तारखा जवळ येत असल्याने इच्छुक उमेदवारांची घाईगडबड वाढली आहे. प्रशासनाने कागदपत्र पडताळणीसाठी विशेष मदत कक्ष सुरू करावेत, अशी मागणी उमेदवारांकडून केली जात आहे कागदपत्रांच्या या धावपळीतूनच महापालिका निवडणुकीची खरी तयारी सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे.

# राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियममध्ये लिंबूवर्गीय शेतीच्या शाश्वत विकासावर होणार मंथन

## ● जैन हिल्स येथे २१ पासून आयोजन; शास्त्रज्ञ, शेतकऱ्यांची उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव

**देशातील लिंबूवर्गीय फळ अर्थात संत्री, मोसंबी, लिंबूच्या उत्पादनाला नवी दिशा देण्यासाठी इंडियन सोसायटी ऑफ सिट्रीकल्चर आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २३ डिसेंबरदरम्यान राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियमचे आयोजन केले आहे. जैन हिल्स येथे होणाऱ्या या परिषदेत देशभरातील संशोधक, प्रगतशील शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि उद्योजक लिंबूवर्गीय शेतीच्या शाश्वत विकासावर मंथन करतील.**



भारत हा लिंबूवर्गीय फळ उत्पादनात जगात तिसऱ्या क्रमांकावर असूनही, सध्या या क्षेत्रासमोर हवामान बदल, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, दर्जेदार कलमांचा अभाव आणि अनियमित बाजारभाव अशी गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित या परिषदेचा मुख्य विषय भरघोस उत्पादन, हवामान बदल आणि मूल्य साखळी व्यवस्थापन हा ठेवण्यात आलेला आहे. या तीन दिवसीय परिषदेत एकूण नऊ तांत्रिक विषयांवर सविस्तर चर्चा होणार आहे. यामध्ये लिंबूवर्गीय वाणांची सुधारणा, रोगमुक्त कलमांची निर्मिती, अचूक शाश्वत शेती, सेंद्रिय लागवड आणि फळबाग आरोग्य व्यवस्थापन यांचा समावेश आहे.

# विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ मंगळवारी रंगणार

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ मंगळवार दि. २३ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न होत असून, या समारंभाची तयारी पूर्ण झालेली आहे.**




या दीक्षांत समारंभासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी राहणार असून राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळूरुचे संचालक प्रा.गणेशन कन्नबीरन यांचे दीक्षांत भाषण होणार आहे.

या समारंभात, एकूण २९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी समारंभात नोंदणी केली असून. यामध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे १२, २५९ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ४, ५९९ स्नातक, मानवविज्ञान विद्याशाखेचे ६,४१९ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे २,२६० स्नातकांचा समावेश आहे. यात स्वायत्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे २८७, मुळजी जेठा महाविद्यालयाचे १२७१, प्रताप महाविद्यालयाचे ८५२, जी.एच.रायसोनी इन्स्टीट्युट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंटचे ९६३, व आर. सी. पटेल इन्स्टिटयुट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूरचे १८७ अशा ३,५६० विद्यार्थ्यांना पदवी बहाल केली जाणार आहे. गुणवत्ता यादीतील १२० विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या मध्ये ८८ मुले व ३२ मुलींचा समावेश आहे. या समारंभात १९५ पीएच.डी. धारक विद्यार्थी देखील पदवी घेणार आहेत.

**कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण**

कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांनाही बघता यावे यासाठी महाविद्यालयांनी व्यवस्था करावयाची आहे. या बाबत सर्व महाविद्यालयांना सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभास येण्याकरीता शहर बस सेवेची व्यवस्था असणार आहे.

## पान १ वरुन

**रस्ते अपघातातील जखमींना......**

उभारली जात आहे. पोलीस किंवा कोर्टाची भीती बाळगू नका.! - अनेकदा लोक चौकशीच्या भीतीने मदत करायला कचरतात.

मात्र, सरकारने पुन्हा स्पष्ट केले आहे की: मदत करणाऱ्या व्यक्तीची सक्तीने चौकशी केली जाणार नाही. त्यांना साक्षीसाठी कोर्टात खेचले जाणार नाही. ही योजना राष्ट्रीय महामार्गांसह राज्य महामार्ग, जिल्हा आणि ग्रामीण रस्त्यांवरील अपघातांसाठीही लागू असेल.

**राजस्थानमध्ये भाड्याच्या......**

धर्मांतर करत होते. यामुळे धार्मिक भावना भडकण्याचा धोका होता. आता ताब्यात घेतलेल्यांची चौकशी सुरू आहे. विश्व हिंदू परिषदेने बेकायदेशीर धर्मांतराचा आरोप करत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हे वादग्रस्त घर जोगेंद्र सिंग पेटीवाले यांच्या कुटुंबाचे होते आणि ते भाड्याने घेतले होते. रस्त्यातील रहिवाशांनाही याची माहिती नव्हती. गेल्या काही दिवसांपासून परदेशी लोकांसह संशयास्पद लोकांच्या हालचाली वाढल्या होत्या. सीआयडीच्या गुप्तचर विभागालाही याची माहिती मिळाली आणि तेही घटनास्थळी पोहोचले.

**काळ्याबाजारात जाणारा......**

दरम्यान, शेतकऱ्यांचा युरिया काळ्या बाजारात वळवणाऱ्यांवर कृषी विभागाची नजर असून, यापुढेही अशा घटकांवर कडक व निर्भीड कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

**जळगाव महापालिका निवडणुकीची......**

नमूद केल्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत जळगाव महानगरपालिकेची निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. या निवडणुकीत भाजपचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी आणि पक्षाची ताकद वाढवण्यासाठी आमदार राजूमामा भोळे यांच्या संघटन कौशल्यावर पक्षाने विश्वास दाखवला आहे.

सर्वांना सोबत घेऊन, अथक परिश्रम करून पक्षातर्फे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याची जबाबदारी आता निवडणूक प्रमुख म्हणून आ. भोळे यांच्यावर असणार आहे. या नियुक्तीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**पणन मंत्री जयकुमार रावल......**

वारंवार पाठपुरावा करूनही आरोपींकडून टाळाटाळ करण्यात आली.

शर्मा ॲग्रोटेक इंदूर, खेतान ॲग्रोटेक रतलाम तसेच इतर संबंधित आरोपींनी आपापसातील आर्थिक अडचणी व व्यवहारांमुळे संगनमत करून फिर्यादी यांच्या फॅक्टरीसाठी लागणारी सायलो प्रोजेक्टची मशिनरी वेळेत न पुरवता, त्यांच्याकडून घेतलेली ३० लाख २५ हजार रुपयांची रक्कम परत न देता विश्वासघात केला. या प्रकरणामुळे फॅक्टरीला मशिनरी बसविण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनावर परिणाम होऊन सुमारे एक कोटी १० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा फिर्यादी यांनी केला आहे.

या प्रकरणी प्रमोद नथमल शर्मा व नथमल शर्मा (रा. क्लार्क कॉलनी, इंदूर), खेतान ॲग्रोटेकचे एस. के. झा (इंदूर), वरुण इन्फोटेक ग्वालियरचे जितेंद्र अशाराम नागवाणी तसेच स्टार डिजी होम इंदूरचे शावीर खान लियाकत खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक इमरान खान यांच्याकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. औद्योगिक क्षेत्रातील मोठ्या रकमेच्या या फसवणुकीमुळे दोंडाईचा-शिंदखेडा परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात ठाऊक केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाला आहे. परिसराच्या विकासाला हातभार - माजी मंत्री आणि आमदार जयकुमार रावल यांचा दोंडाईचा येथील या स्टार्च प्रकल्पाशी थेट व्यावसायिक आणि कौटुंबिक संबंध आहे. युनिव्हर्सल स्टार्च-केम अलाईड लिमिटेड असे या प्रकल्पाचे नाव असून या स्टार्च प्रकल्पाची स्थापना जयकुमार रावल यांचे आजोबा आणि सहकार महर्षी म्हणून ओळखले जाणारे दादासाहेब रावल यांनी केली. हा प्रकल्प मका प्रक्रियेवर आधारित असून तो उत्तर महाराष्ट्रातील (धुळे-नंदुरबार) सर्वात मोठ्या उद्योगांपैकी एक आहे. या कारखान्यामुळे दोंडाईचा आणि शिंदखेडा परिसरातील हजारो शेतकऱ्यांना मका पिकासाठी बाजारपेठ आणि स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे, ज्याचा जयकुमार रावल यांच्या राजकीय वर्चस्वातही मोठा वाटा मानला जातो.

# संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराजांना अभिवादन



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा तेली समाज शिक्षण प्रसारक मंडळ व जळगाव शहर तेली पंच मंडळाच्यावतीने बुधवार, दि.१७ रोजी संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**

तेली समाज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ समाज बांधवांच्या हस्ते संताजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी पांडुरंग चौधरी, देवेंद्र गांगुर्डे, दुर्गेश चौधरी, रवींद्र चौधरी, मनोज चौधरी, दिलीप चौधरी, कैलास चौधरी, सुनील चौधरी, विष्णू चौधरी, सचिन पाटील यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदान केंद्र म्हणून वापरल्या जाणाऱ्या शाळांना १९, २० डिसेंबरला सुटी जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायतीच्या सुधारीत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार भुसावळ, अमळनेर, सावदा, यावल, वरणगाव, पाचोरा या ६ नगरपरिषदांमधील ९ प्रभागांमध्ये २० रोजी मतदान तर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर त्या-त्या नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या हद्दीतील ज्या प्रभागांमध्ये मतदान आहे, त्या प्रभागातील मतदान केंद्र असणाऱ्या शाळांना दि.१९ आणि २० रोजी सुटी जाहीर करण्यात आली आहे.**



मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच दि.१९ रोजी संबंधित मतदान अधिकारी, कर्मचारी मतदान केंद्रांवर पोहचणार आहेत. त्यामुळे ही सुटी देण्यात आल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव यांच्या आदेशान्वये ही सुटी देण्यात आली आहे. जिल्ह्यातील संबंधित शाळांच्या सुट्यांची नोंद पालक व विद्यार्थी यांनी घ्यावी, असे आवाहन देखील जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


# जळगावात आज रंगणार खान्देशस्तरीय कुमार साहित्य संमेलन

## ● कवी, गीतकार डॉ.दासू वैद्य साधणार साहित्यिकांशी संवाद; विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदा देखील खान्देशस्तरीय कुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा संमेलनाचे ९ वे वर्ष असून शनिवार, दि.२० रोजी बकिंमचंद्र चट्टोपाध्याय साहित्य नगरीत हे संमेलन पार पडणार आहे.**

कुमार साहित्य चळवळ वृध्दींगत व्हावी, यासाठी विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे गेल्या आठ वर्षांपासून खान्देशस्तरीय कुमार साहित्य संमेलनाचे आयोजन केले जात आहे. यंदा देखील शनिवार, दि.२० रोजी डॉ.अविनाश आचार्य विद्यालयातील बकिंमचंद्र चट्टोपाध्याय साहित्य नगरीत या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे संमेलन 'वंदे मातरम्' या संकल्पनेला समर्पित असून छत्रपती संभाजीनगर येथील कवी, गीतकार डॉ.दासू वैद्य हे कुमार साहित्यीकांना मार्गदर्शन करणार आहेत. या कुमार साहित्य संमेलनात सहभागी होवून विद्यार्थ्यांना आनंद द्विगुणीत करावा, असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.




### ■ ग्रंथदिंडीने होणार संमेलनाला प्रारंभ...

साहित्य संमेलनाच्या सुरुवातीला सकाळी ७.३० वाजता काव्यरत्नावली चौकातून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर ८.३० वाजता कार्यक्रमस्थळी नोंदणीला सुरुवात होणार आहे. ९.१५ ते १० वाजेदरम्यान उद्घाटन, १०.१५ ते १२.३० दरम्यान वंदे मातरम् सभागृहात अभिवाचन तर पसायदान सभागृहात काव्यवाचन करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी १.३० ते ४ वाजेदरम्यान, वंदे मातरम् सभागृहात परिसंवाद तर पसायदान सभागृहात कथाकथन होणार आहे. त्यानंतर दुपारी ४.१५ ते ५.१५ वाजेदरम्यान 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील कवी व गीतकार डॉ.दासू वैद्य यांची प्रकट मुलाखत होणार आहे. त्यानंतर ५.१५ वाजता प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# जामिया संस्थेला मिळालेल्या फंडाची चौकशी करा

## भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी पत्रकार परिषदेत केली मागणी

प्रतिनिधी । अक्कलकुवा

**येथील जामिया ईस्लामिया ईशाअतुल उलूम संस्था बंद करुन त्यांच्या इमारतीत शासकीय योजना सुरु कराव्यात तसेच या संस्थेला मिळालेल्या देशविदेशातील फंडाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी पत्रकार परिषदेत केली.**

श्री. चौधरी म्हणाले, अक्कलकुवा येथील जामिया ईस्लामिया ईशाअतुल उलूम या संस्थेने बेकायदेशीररित्या आदिवासींच्या शेकडो एकर जमिनी घेवून त्या जागी मोठ्या इमारती उभ्या केल्या आहेत. या इमारतींमध्ये शिक्षण देण्याच्या नावाखाली धार्मिक शिक्षण देण्यात येवून देशविरोधी कारवाया केल्या जातात. दोन दिवसांपुर्वीच या संस्थेने बेकायदेशीररित्या बळकावलेली जमिन मूळ मालकाला हस्तांतरीत करण्याचे आदेश तहसिलदारांनी दिले आहेत. त्यामुळे जामिया संस्था जिथे सुरू आहे त्या इमारती शासनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात.



त्या इमारतीत शासकीय कार्यालय किंवा आश्रमशाळा सुरू करण्यात यावी. आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांचे वसतिगृह सुरू करावे. संस्थेला मिळालेल्या सर्व देणग्याची चौकशी करावी. ज्या जमिनीवर इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्या जमीन मालकाला मोबदला देण्यात यावा.

जामिया ईस्लामिया ईशातुल उलुम संस्था देशविरोधी कृत्य करत आहे. येमेन या देशाचा परकीय नागरीक खालेद इब्राहिम सालेहर अल खदामी हा बेकायदेशीर राहत होता. त्याच्या मुलांना या संस्थेने बेकायदेशीर जन्म दाखला व आधारकार्ड मिळवून दिले. वास्तविक येमेन देशाचा नागरीक खालेद इब्राहिम सालेहर अल खदामी याच्या मुलीचा जन्म अक्कलकुवा येथे झाला नसतांनासुध्दा तिचा जन्मदाखला व आधारकार्ड मिळवुन दिले.

जन्म ९ नोंद २००

२०१७ ते २०२५ पर्यंत संस्थेचे युनानी कॉलेज आणि अल सलाम हॉस्पीटल येथे फक्त ९ डिलेव्हरी झालेली असतांना २०० हुन अधिक खोटया डिलेव्हरी झाल्याच्या कागदोपत्री नोंदी दाखवुन सरकारचे अनुदान हडप केलेले आहे. जामिया ईस्लामिया ईशाअतुल उलूम या संस्थेत अनेक विदेशी नागरीक वास्तव्याला असतात, परंतु त्यांच्या बददलची माहिती ही संस्था स्थानिक पोलिसांना देत नाही.

**विदेशी फंड प्राप्त**

**विदेशी फंडींग प्राप्त करण्यासाठी ज्या संस्था उभारण्यात आल्या, त्या संस्था फिल्डवर कुठल्याही प्रकारे कार्यरत नाहीत.**

**जामिया ईस्लामिया ईस्लामिया ईशातुल उलुम संस्थेमधील ८० टक्के विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण दिले जात आहे.**

**वास्तविक आधुनिक शिक्षणाची गरज असतांना धार्मिक शिक्षणाची गरज काय ?**

**तुम्हाला देश इस्लामिक करण्याचा, हिरवे करण्याचा षडयंत्र आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी उपस्थित होते.**

### बाहेर राज्यातील विद्यार्थी

जामिया ईस्लामिया ईशातुल उलुम या संस्थेत पश्चिम बंगाल, बिहारचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहे. विशेषत्वाने पश्चिम बंगालचे विद्यार्थी हे खरच भारतीय आहेत का? याविषयी पोलीसांकडुन शहानिशा होणे गरजेचे आहे. जामिया ईस्लामिया ईशातुल उलुम या संस्थेच्या अनेक ईमारती हया बेकायदेशीर, कुठल्याही परवानगी न घेता उभ्या राहिलेल्या आहे. या संस्थेला आतापर्यंत देश विदेशातून ६५० कोटींहून अधिक रुपये आलेले आहे. हा पैसा देशातील विविध ठिकाणी मशिदी बांधण्यासाठी दिला जात आहे. ईतकेच नव्हे तर काश्मीरमधील बंदी असलेल्या एका एन.जी.ओ ला देखील पैसे पाठविले गेले आहे.

## नवनाथ नगरात माजी सैनिकाकडे घरफोडी

प्रतिनिधी । धुळे

देवपूरातील वाडीभोकर रोडवरील नवनाथ नगरातील माजी सैनिकाकडे चोरट्यांनी धाडसी घरफोडी केली. रोकडसह ३७ ग्रॅमचे सोन्याचे दागिने आणि ३१ ग्रॅमचा चांदीचा करंडा लंपास केला. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत माजी सैनिक ज्ञानेश्वर युवराज भदाणे (वय ४१ रा. प्लॉट नं. १२ नवनाथ नगर) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १२ ते १५ डिसेंबरदरम्यान चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे लॉक तोडून आत प्रवेश केला. ४५ हजाराची रोकड, ३७ ग्रॅमचे सोन्याचे दागिने त्यात सोनसाखळी, अंगठी, ३१ ग्रॅमचा चांदीचा करंडा असा एकुण १ लाख १८ हजार ५०० रूपयांचा ऐवज लंपास केला. या चोरीचा तपास पीएसआय साईनाथ तळेकर करीत आहेत.

## थोडक्यात

### मनपा उमेदवारीसाठी इच्छुकांची फिल्डिंग

**धुळे ।** महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहू लागताच शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आता उमेदवारी मिळवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी कंबर कसली असून, पक्षश्रेष्ठींकडे आपली वर्णी लावण्यासाठी जोरदार मफिल्डिंगफ लावण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिकेवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष सज्ज झाले आहेत. या निवडणुकीत केवळ अनुभवी माजी नगरसेवकच नव्हे, तर अनेक नवीन चेहरेही नशीब आजमावण्यासाठी उत्सुक आहेत. निवडणूक लढवण्यासाठी मगुडघ्याला बाशिंगफ बांधून तयार आहे.

## दोन लाखांची लाच; सिनेट सदस्य नितीन ठाकूरला अटक

प्रतिनिधी । धुळे

**तक्रारदाराच्या जातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी न्यू सिटीचे उपशिक्षक तथा सिनेट सदस्य नितीन लीलाधर ठाकूर (वय ४६) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. १८ रोजी दुपारी सापळा रचून अटक केली. या कारवाईमुळे धुळ्यातील राजकीय आणि शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**



तक्रारदार व त्याच्या बहीणीस जातीचे प्रमाणपत्र मिळवायचे होते. याकरीता सन २०२२ मध्ये येथील अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती मंजूरीसाठी प्रकरण दाखल केले होते. तेथील एका तुम्हाला कर्मचाऱ्याने जातीचे प्रमाणपत्र हवे असेल तर न्यु सिटी हायस्कूलमधील शिक्षक नितीन लीलाधर ठाकूर यांना भेटा असे सांगितले. त्यानुसार तक्रारदाराने ठाकूरांशी संपर्क साधला असता ठाकुर यांनी एका प्रमाणपत्रासाठी अडीच ते तीन लाख रूपये लागतील असे तक्रारदारास सांगितले. अनेकवेळा पैसे देण्याचे ठरले पण आरोपी नितीन ठाकुर हा पैसे घेण्यास टाळाटाळ करत होता. अखेर चार महिन्यानंतर अर्थात १८ डिसेंबर रोजी येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची शहानिशा केल्यानंतर, एसीबीच्या पथकाने गुरुवारी दुपारी सापळा रचला. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर नितीन ठाकूर याला अटक केली.

## धुळ्यात घरफोडी करणारी टोळी गजाआड

### १५.६० लाखांचे सोने जप्त, ६ गुन्ह्यांची उकल

प्रतिनिधी । धुळे

**धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला अटक करून पोलिसांनी सहा घरफोडी गुन्ह्यांची उकल केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १५ लाख ६० हजार रुपये किमतीचे १२० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल हस्तगत केली आहे.**



दि. २४ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान कुसुंबा (ता.जि. धुळे) येथे वसंतराव राजाराम चव्हाण यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची तक्रार धुळे तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. याच कालावधीत कुसुंबा, नेर, मोराणे, कुंडाणे व अकलाड या गावांमध्ये घरफोडीच्या घटना घडल्या होत्या.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने पारंपरिक तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत तपास सुरू केला. तपासादरम्यान तीन राज्यांतील सुमारे ३७५ -ANPR सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे विश्लेषण करण्यात आले. सलग १७ दिवसांच्या तपासानंतर पोलिसांचे पथक थेट गुजरातमधील दाहोद व गोधरा जिल्ह्यांपर्यंत पोहोचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी धुळे तालुक्यातील सहा घरफोडी गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्यांच्या स्थानिक साथीदारालाही अटक करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे अटक केलेल्या आरोपींविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हेगारी इतिहास नव्हता. गुन्हा करून ते तात्काळ परराज्यात पसार होत असल्याने ते पोलिसांच्या अभिलेखात आले नव्हते. या कारवाईत सहभागी पोलीस अधिकारी व अंमलदारांचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास माळी व पथकाकडून सुरू असून आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येत आहे.

## दोंदवाडा शिवारात ८५ लाखांचा गांजा जप्त, पोलिसांनी केले एकाला अटक

प्रतिनिधी । धुळे

**शिरपूर तालुका पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी मोहिमे अंतर्गत बुधवारी कारवाई केली आहे. तालुक्यातील दोंदवाडा गावच्या शिवारात शेतात बेकायदेशीररीत्या लागवड केलेला सुमारे ८५ लाख १४ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एका संशयित आरोपीला अटक करण्यात आली असून पोलिस अधिक तपास करत आहेत.**



१७ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास महादेव दोंदवाडा शिवारात छापा टाकला. यावेळी शेतामध्ये गांजाच्या झाडांची बेकायदेशीर लागवड केल्याचे आढळून आले. आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हा माल व्यापारी मात्रेत भविष्यात विक्री करण्याच्या उद्देशाने लावला होता. या कारवाईत पोलिसांनी ४० हजार स्केअर फूट या क्षेत्रात ८५ लाख १३ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गणपत साहेबराव पावरा (वय २८, रा. महादेव दोंदवाडा) याला अटक शिरपूर केली आहे. आरोपीविरुद्ध तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील गोसावी, शिरपूर तालुका पोलिस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## शिंदखेडा शहरात भरदिवसा घरफोडी

प्रतिनिधी । शिंदखेडा

शहरात भरदिवसा झालेल्या चोरीच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. एकाच दिवशी शहरातील तीन ठिकाणी चोरट्यांनी हालचाल करत दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न केला, तर लक्ष्मीनारायण कॉलनीतील एका घरातून सोन्याचे दागिने व रोकड मिळून तब्बल ६५ हजार ९०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी सुरुवातीला लालचंद नगर येथील सुनील दगडू माळी यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र तेथे काहीही हाती लागले नाही. त्यानंतर वरुळ रस्त्यालगत गं. स बँक परिसरातील बांधकाम विभागातील भामरे यांच्या घरातही चोरीचा प्रयत्न करण्यात आला, परंतु तोही फसला. त्यानंतर चोरट्यांनी



लक्ष्मीनारायण कॉलनीत शिरकाव करत प्रशांत शंकर देशमुख यांच्या बंद घराला लक्ष्य केले.

देशमुख कुटुंबीय कामानिमित्त बाहेर असताना चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. लोखंडी कपाटाची चावी वरच ठेवलेली असल्याने कपाट उघडून सोन्याचे दागिने व रोकड असा ६५ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना सकाळी साडेअकरा ते बारा वाजेदरम्यान घडली. विशेष म्हणजे, या परिसरात कायम वाहनांची व नागरिकांची वर्दळ असतानाही चोरट्यांनी अवघ्या ५ ते ७मिनिटांत चोरी केल्याचे समोर आले आहे. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून, दिवसा इतकी धाडसी चोरी होत असेल तर रात्री काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, नागरिकांनी पोलिस प्रशासनाने तत्काळ तपास करून चोरट्यांना अटक करावी, तसेच शहरात दिवस-रात्र गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. काल संध्याकाळी दिवसा चोऱ्या झाल्यामुळे रात्री दीड वाजेला एक छोटासा पेट्रोलिंगचा आवाज ऐकू आला, तोही फक्त मुख्य रस्त्यावरूनच. शहरात पीआय ज्ञानेश्वर वारे यांच्या कडक शिस्तीची जरब असावयास हवी. कॉलनी परिसरात ज्या ठिकाणी रहिवास आहे, अशा ठिकाणी पेट्रोलिंगचा आवाज आलाच पाहिजे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

### पेट्रोलिंग होत नसल्याची नागरिकांची खंत

**शिंदखेडा पोलीस स्टेशनला गेल्या सहा महिन्यापासून बदलून आलेले पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्याबाबत असलेली भिती आज पूर्णपणे मावळली आहे. रात्रीची पोलिस गस्त कुठेही आढळून येत नाही. एवढेच नव्हे शिंदखेडा शहरातील असलेल्या कॉलनी वसाहतीत रात्रीची गस्त प्रत्येक ठिकाणी करणे गरजेचे असताना आज तागायत कुठलेही पेट्रोलिंग होत नसल्याची खंत रहिवाशांनी बोलून दाखविले.**

## पिंपळनेर येथे नरेंद्रचार्य महाराज पादुका दर्शन सोहळा; शोभायात्रेने वेधले लक्ष







प्रतिनिधी । पिंपळनेर

**येथे रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सामोडे रस्त्यावरील राजे छत्रपती इंग्लिश मीडियम शाळेजवळील प्रांगणात हा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला.**

सकाळी नऊ वाजता खंडोजी महाराज कुस्ती मैदानातून नरेंद्रचार्य महाराजांच्या पादुकांची सजवलेल्या रथातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ही मिरवणूक माळी गल्ली, महात्मा फुले चौक, विश्वनाथ चौक, नाना चौक, बाजारपेठ, खोल गल्ली, सटाणा रोड व एसटी बस स्टॉप चौफुली मार्गे कार्यक्रमस्थळी पोहोचली.

दुपारी बारा वाजता महेंद्रचार्य महाराज यांच्या बालकांचे भक्ती मंडपात आगमन झाले. यानंतर सत्संग प्रवचन, नामदान, पादुका दर्शन व महाप्रसाद भंडाऱ्याचे

आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात तीनशे जोडप्यांचे गुरुपूजन झाले, तर अकराशे नव्या उपासकांनी दीक्षा घेतली. यावेळी गरजू बेरोजगारांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संत स्थानापन्न झाले. तसेच आ.सौ मंजुळा गावित, हभप भालचंद्र दुसाने, हभप काळे महाराज, एपीआय किरण बर्गे, संभाजीराव अहिरराव, डॉ. चंद्रकांत खैरनार, पादुका सोहळा प्रमुख किरण पाटील, धुळे जिल्हा महिला प्रमुख हेमाक्षी चौधरी, शिवाजी सांगळे, प्रविण गायकवाड, हरीश गंगाधर माळी, दिंडी प्रशासन अधिकारी नितीन शेळके, संदीप थोटे, गजमल गांगुर्डे, संदीप खैरनार, बबलू चौधरी, योगेश चौधरी, विशाल चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश चौधरी यांनी केले. नानिजधाम पिठातर्फे दीड लाख वृक्षारोपण, शंभर पाझर तलाव तसेच महामार्ग अपघातांसाठी ५१ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. धार्मिकतेबरोबरच सामाजिक उपक्रमांवरही भर दिला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पादुका दर्शन समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभघेतला.

# चार दिवसांपासून बेपत्ता तरुणाचा मृतदेह रामदेववाडीच्या जंगलात आढळला

## जुन्या वादातून जीवलग मित्रांनीच हत्या केल्याचे निष्पन्न; दोन संशयित ताब्यात

प्रतिनिधी । जळगाव



**जिल्ह्यात बेपत्ता नऊ वर्षीय मुलीचा मृतदेह पाचव्या दिवशी एका विहिरीत सापडल्याची घटना ताजी असतानाच, शुक्रवारी पुन्हा चार दिवसांपासून बेपत्ता तरुणाचा मृतदेह रामदेववाडी (ता. जळगाव) गावालगतच्या जंगलात पोत्यात आढळून आला. जुन्या वादातून जीवलग मित्रांनीच त्याची हत्या केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर औद्योगिक वसाहत पोलिसांनी गुजरातमधून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.**

निलेश राजेंद्र कासार (२७, रा. दत्त चैतन्य नगर, जामनेर, जि. जळगाव), असे मृत तरूणाचे नाव आहे. निलेश हा १५ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजेपासून बेपत्ता झाला होता. त्यानंतर त्याचा मोबाईल फोनही बंद येत असल्याने कुटुंबिय आणि नातेवाइकांनी त्याचा सर्वत्र शोध घेण्यास सुरुवात केली. मित्र, ओळखीच्या व्यक्ती तसेच संभाव्य ठिकाणी चौकशी करूनही त्याचा काही ठावठिकाणा लागू शकला नाही. दरम्यान, रामदेववाडी (ता. जळगाव) परिसरात निलेशची दुचाकी आढळून आली. ही बाब अधिकच संशयास्पद ठरल्याने कुटुंबियांची चिंता वाढली. अखेर याप्रकरणी औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात निलेश बेपत्ता असल्याची अधिकृत नोंद करण्यात आली. त्यानुसार, बेपत्ता निलेशचा शोध पोलिसांकडून घेण्यात आला.

औद्योगिक वसाहत पोलिसांनी एकूण प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेली गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी विशेष पथक तयार करून गुजरातमध्ये जावून छापा टाकला.

या कारवाईत भूषण पाटील आणि दिनेश चौधरी उर्फ महाजन या दोघा संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, जुन्या किरकोळ वादातून त्या दोघांनी निलेशची हत्या केल्याची धक्कादायक कबुली दिली. चौकशीदरम्यान त्यांनी निलेशचा मृतदेह पोत्यात भरून रामदेववाडी परिसरातील जंगलात असलेल्या पाण्याच्या तळ्यात फेकून दिल्याचेही कबूल केले. याप्रकरणी त्या

दोघांना खूनप्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे.

**● संशयितांनी चौकशीदरम्यान दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी पोलिसांनी शिरसोली ते रामदेववाडी दरम्यानच्या जंगलात व्यापक शोध मोहीम राबवली. पोलीस पथकाने घनदाट जंगल, पाणवठे आणि दुर्गम भाग पिंजून काढला. सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास रामदेववाडी येथील जंगलातील एका तलावात निलेशचा मृतदेह पोत्यात आढळून आला. ही माहिती समजताच परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे मृत निलेशच्या जामनेर येथील नातेवाइकांमध्ये शोककळा पसरली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रवाना केला. याप्रकरणी औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे. पुढील कायदेशीर कारवाई पोलिस करीत आहेत.**





# नगरपालिका निकालाची उमेदवारांमध्ये धाकधूक

● स्थानिक स्वराज्य संस्थांचा उद्या निकाल

प्रतिनिधी । जळगाव



**जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीचा निकाल रविवार दि. २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार असल्याने संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**

निकालाच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांचे नेते, नगरसेवक पदाचे उमेदवार तसेच नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि धाकधूक निर्माण झाली आहे. मतदारांनी कोणाला पसंती दिली? सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार? याबाबत सर्वत्र चर्चांना ऊत आला आहे.

यंदाच्या निवडणुकीत सत्ताधारी व विरोधकांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. प्रचाराच्या काळात विकासकामांचे आश्वासन, स्थानिक प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, कर आकारणी आदी मुद्दे केंद्रस्थानी होते. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात आरोप-प्रत्यारोपांनी वातावरण अधिकच तापले होते. त्यामुळे मतदारांचा कौल नेमका कोणत्या बाजूने लागेल, याचा अंदाज बांधणे अवघड झाले आहे. निकाल जाहीर होताच कोणत्या पक्षाला बहुमत मिळणार, तर कुठे त्रिशंकू परिस्थिती निर्माण होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काही ठिकाणी अपक्ष उमेदवार निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. निकालानंतर सत्तास्थापनेसाठी पक्षांमध्ये हालचालींना वेग येण्याचीही शक्यता आहे. मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आवश्यक तयारी पूर्ण केली असून शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय समीकरणे स्पष्ट होणार असून आगामी काळातील विकासाची दिशा यावर ठरणार आहे.

# फैजपूर नगरपरिषद निवडणुकीचा उद्या निकाल

प्रतिनिधी । फैजपूर

येथील नगरपालिका निवडणूक पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी म्युनिसिपल हायस्कूल पटांगणावर मत मोजणी होणार असून नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवार रिंगणात आहे मात्र खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार सुमय्या बी शे. कुर्बान आणि भाजपाच्या प्रतिस्पर्धी उमेदवार दामिनी पवन सराफ यांच्यात काट्याची टक्कर होणार आहे शहरात एकूण २७ हजार ५०० एकूण मतदार होते. त्यांनी २० हजार मतदारांनी





मतदानाचा हक्क बजाविला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सुमय्या बी शे. कुर्बान आणि भाजपाच्या सौ. दामिनी सराफ यांनी प्रचारार्थ दरम्यान शक्ती प्रदर्शन केले होते वरील दोघे उमेदवार अमोरा समोर टक्कर असून उद्या दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी मतमोजणीला सुरुवात होईल तर ३ वाजेपर्यंत निकाल येण्याची शक्यता आहे तसेच नगरसेवक पदासाठी १० प्रभाग होते त्यात २१ वार्ड निश्चित करण्यात आले प्रभाग क्रमांक १०, प्रभाग क्रमांक ६, प्रभाग क्रमांक ४, प्रभाग क्रमांक ३, प्रभाग क्रमांक ५, अशा प्रभागांमध्ये एकूण ५ नगरसेवक बिनविरोध झालेले आहेत. तर ६२ उमेदवार रिंगणात आहेत. तर १६ निवडून येतील मतमोजणी साठी २० दिवसा पासून फैजपूरच्या म्युनिसिपल हायस्कूल मध्ये कडक बंदोबस्त करण्यात आलेली आहे. एपीआय रामेश्वर मोताळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने लावलेला आहे.

## थोडक्यात

### नगरपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीबाबत आढावा बैठक

**भुसावळ ।** भुसावळ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने मतमोजणी प्रक्रियेबाबत आज दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. ही बैठक तापी सभागृह येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सर्व मतमोजणी पर्यवेक्षक, सहायक मतमोजणी पर्यवेक्षक अधिकारी तसेच मतमोजणी कामासाठी नेमण्यात आलेले विविध कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मतमोजणी प्रक्रिया दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयातील शासकीय धान्य गोदाम येथे पार पडणार असल्याची माहिती देण्यात आली. मतमोजणीस सुरुवात प्रथम टपाली मतदानाच्या मतमोजणीने होणार असून त्यानंतर ईव्हीएमद्वारे मतदानाची मतमोजणी करण्यात येणार आहे.

# दिव्यांग सक्षमीकरणासाठी कार्यरत

● स्वयंदिप संस्थेची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी चाळीसगाव येथील स्वयंदिप अपंग विकास बहुउद्देशीय संस्था यास भेट देऊन संस्थेच्या एकूण कामकाजाची तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी व आत्मनिर्भरता केंद्रित उपक्रमांची नुकतीच पाहणी केली.**

या संस्थेमार्फत दिव्यांग महिला व व्यक्तींना सक्षम व आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. विशेषतः चाळीसगाव येथे दिव्यांग महिलांच्या सहभागातून सुरू करण्यात आलेल्या रेडिमेड कपडे निर्मिती युनिटची जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी पाहणी केली. या उपक्रमामुळे रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास व आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या कार्यपद्धती, उपक्रमांची अंमलबजावणी व सामाजिक योगदानाबाबत माहिती घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी संस्था करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देण्याबाबत प्रशासन सकारात्मक भूमिका बजावेल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रमोद हिले, चाळीसगावचे तहसीलदार प्रशांत पाटील , चाळीसगाव तसेच मुख्याधिकारी सौरभ जोशी, नगरपरिषद, चाळीसगाव उपस्थित होते.

# भारताच्या विकासाच्या पायाभरणीत अल्पसंख्यांक समुदायाचे मोठे योगदान : प्रा. जोगेश्वरी पाटील

प्रतिनिधी । भुसावळ

येथील कला, विज्ञान आणि पु.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय भुसावळ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एच. ब-हाटे हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. जोगेश्वरी पाटील ह्या होत्या.प्रमुख उपस्थिती अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.टी. धुम आणि विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. विलास सोळुंके प्रा. संगीता भिरुड डॉ.साहेबराव राठोड यांची होती.प्रा. जोगेश्वरी पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना 'लोकशाहीचे यश हे बहुसंख्य लोक अल्पसंख्याकांना किती सुरक्षित ठेवतात यावर अवलंबून असते ह्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला देत संविधानाने सर्वांना सर्वप्रथम ते भारतीय असल्याचे बिंबवले आहे,' असे अधोरेखित केले. 'अल्पसंख्यांक समुदायातील लोकांसाठी सरकारने अनेक शैक्षणिक व कौशल्य विकास योजना आणून त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे.

अल्पसंख्यांक समुदायाने खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीत अनमोल योगदान दिलेले आहे, असे स्पष्ट केले.

# गिरणेतून सिंचनासाठी पहिले आवर्तन सोडले

प्रतिनिधी । चाळीसगाव

तालुक्यासह तीन जिल्ह्याची तहाण भागवणाऱ्या गिरणा धरणातून सिचनासाठी पहिले आवर्तन दुपारी १२ वाजता कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग जळगाव यांच्या आदेशान्वये व उपविभागीय अभियंता पाटबंधारे उपविभाग चाळीसगाव यांच्या मार्गदर्शनाने सोडण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या जिज्ञासूवृत्तीला चालना देण्यासाठी विज्ञान प्रदर्शन उपयुक्त-आ. किशोर पाटील

प्रतिनिधी । पाचोरा




तालुक्यातील गाळण बुद्रक येथील पंचायत समिती शिक्षण विभाग व वसंतराव नाईक प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा गाळण बु यांच्या संयुक्त विद्यमाने गाळण येथे तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन उत्साहात झाले. या प्रदर्शनाचे उदघाटन पाचोरा भडगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार किशोर पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आश्रम शाळेचे अध्यक्ष बाबुलाल हरी राठोड होते. प्रमुख अतिथी म्हणुन तहसीलदार विजय बनसोडे, गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, गटशिक्षणाधिकारी विजय पवार, पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड, मुख्याध्यापक रमेश पाटील, मुख्याध्यापिका कल्पना राठोड, शिक्षक सेना कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, विज्ञान शिक्षक रवींद्र चौधरी यांच सह सर्व केंद्र प्रमुख उपस्थित होते. सुमारे ११० बाल वैज्ञानिकांनी आपले साहित्य याठिकाणी मांडले. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी केले. सूत्रसंचलन वाल्मिक पाटील सर यांनी केले. आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख अनिल पाटील यांनी केले. तहसीलदार विजय बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आ.किशोर पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत जिज्ञासावृत्तीला विज्ञान प्रदर्शनामुळे चालना मिळत असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी केले. परीक्षक म्हणुन पंकज देठे, रवींद्र सूर्यवंशी, अल्पा सयानी, रवींद्र चौधरी, उल्हास पाटील यांनी काम पाहिले. विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सजावटीसाठी कलाशिक्षक महेंद्र खरे, रवींद्र पाटील, महेश पाटील, व्ही. डी. पाटील, रोहिणी कोळी, पूनम लांडगे, तुषार पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच आश्रम शाळेचे माध्यमिक उच्च माध्यमिक प्राथमिक व वस्तीगृह कर्मचारी शिक्षक वृंद शिक्षिका, गट साधन केंद्राचे कर्मचारी व विशेष शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.


# ई-पीक नोंद राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी ऑफलाईन पीक पाहणीची संधी

● तहसील प्रशासनाचे आवाहन; शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील खरीप हंगाम २०२५ दरम्यान विहित मुदतीत ई-पीक नोंद न झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने ऑफलाईन पीक पाहणीची सुविधा उपलब्ध करून दिली असून, याबाबत शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत, असे आवाहन तहसील प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. लवेसु-२०२५/शिकना/प्र.क्र.३/भुमापन दिनांक १४ डिसेंबर २०२५ अन्वये, ज्या शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने ई-पीक नोंद करणे शक्य





झालेले नाही, त्यांच्यासाठी ऑफलाईन पीक पाहणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाईन पीक पाहणीचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

तहसील प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांकडून अर्ज स्वीकारण्याची मुदत १७ डिसेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ अशी आहे. त्यानंतर ग्रामस्तरीय समितीकडून २५ डिसेंबर २०२५ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येणार आहे.

स्थळ पाहणीचे अहवाल ८ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान उपविभागीय स्तरीय समितीकडे सादर करण्यात येतील. पुढे हे अहवाल १३ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहेत.

ऑफलाईन पीक पाहणी नोंद पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजना, अनुदान, नुकसानभरपाई व इतर मदतीचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. त्यामुळे खरीप हंगाम २०२५ मध्ये ई-पीक नोंद राहिलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा व दिलेल्या मुदतीत अर्ज सादर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी केले आहे.

# डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



प्रतिनिधी । भुसावळ

येथील गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलचे दोन दिवसीय स्नेहसंमेलन दि. १६ रोजी उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाले.

कार्यक्रमास भुसावळ विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) संदीप गावित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे व प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रजनी सावकारे यांची विशेष उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील होते. यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. वर्षा पाटील व शाळेच्या प्राचार्या अनघा पाटील व्यासपीठावर उपस्थित होत्या.